Exh.40

रे. क. नं. ११/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो, क. स्तर, राधानगरी

यांचे कोर्टात...

१. श्री. प्रविण नामदेव ढवण वगैरे ८ ........ वादी

विरूध्द

१. श्री. प्रल्हाद बाबुराव ढवण वगैरे ६ ......... प्रतिवादी

Order-
Seen and filed.
Sd/-
Jt.C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 15/04/2026

यातील वादी नं. १ चे ॲफिडेव्हीट

ॲफिडेव्हीट

मी यातील वादी नं. १. श्री. प्रविण नामदेव ढवण व. व. ३४, धंदाः शेती, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर देवाची शपथ घेवून ॲफिडेव्हीट करतो की,

१. याकामी प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी दाखल केलेल्या कैफियतीमधील संपूर्ण मजकूर खोटा व लबाडीचा असून वस्तुस्थितीचा विपर्यास्त आहे.

२. प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी असलेने व वादीचे पूर्वहक्कदारांचे स्त्री वारसदार यांनी त्यांचे हक्क वादीचे बाजूने सोडलेले असलेने ते या कामी आवश्यक पक्षकार नाहीत. त्याबाबतीत वादी नं. १ यांच्या आई वैशाली व अंजना व बहिणी प्रतिभा व तनुश्री यांनी ता. २०.०२.२०२६ इ. रोजी नोंदणीकृत हक्कसोडपत्र केलेले आहे.

३. एकत्रीकरण अधिकारी यांनी पूर्वहक्कदार यांचे जाबजबाब घेवून मांगेवाडी व नरतवडे या दोन्ही गावच्या जमीनीच्याबाबतीत गट बांधणी करून वादीच्या पूर्वहक्कदारांच्या दोन्ही गावच्या जमीनीची विभागणी केली व नरतवडे

Assistant Suprintendent

गावच्या दावा जमीनी वादीच्या हक्कात अदलाबदलीने दिल्या व प्रतिवादी यांना मांगेवाडी गावच्या जमीनी अदलाबदलीने दिल्या व तसा शेरा एकत्रीकरण अधिकारी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार चौकशीच्या वेळी नमुद केलेला असून ते मान्य असलेबाबत वादीचे पूर्वहक्कदार व प्रतिवादीचे पूर्वहक्कदार यांनी एकत्रीकरण अधिकारी यांचेसमोर सहया व अंगठे केलेले आहेत. केवळ एकत्रीकरण अधिकाऱ्यांचेकडून ९X३ आणि ९X४ चे खाते उतारे तयार करताना चुक झालेली आहे. तथापि त्यांचेकडून झालेली चौकशी ही योग्य आहे. या गोष्टीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे त्यांच्या ७/१२ पत्रकी असलेल्या पोकळ, विनाअधिकार नोंदीच्या आधारे प्रदिर्घ काळानंतर वादीच्या दावा मिळकतीतील मालकी वहिवाटीला हरकत केली म्हणून वादीना दावा दाखल करणे भाग पडलेले आहे.

४. वादीनी कुठेही आपले दावेमध्ये गट बांधणी चुकीची झाली आहे असे म्हटलेले नाही व अगर त्यांनी केलेली चौकशी चुकीची आहे असे म्हटलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा चालविणेचा पूर्ण अधिकार मे. कोर्टांना आहे.

५. प्रतिवादी नं. ४ ने दिलेल्या कैफियतीमधील संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे. योजनेमध्ये कोणतीही चुक झालेली नाही केवळ खाते उतारे तयार करताना झालेली चुक आहे त्यामुळे त्या बाबतीत तुकडे बंदी कायदयानुसार कोणत्याही वरिष्ठ फोरमकडे दाद मागणेची गरज नाही. सदर कैफियत कलम ५, ६, १० मधील संपूर्ण मजकुर खोटा आहे.

६. गट नं. ५०३ ला भाऊ गोविंदा ढवण यांचे एकटयाचे नाव होते. पण अचानकपणे प्रतिवादीचे पूर्वहक्कदारांनी महसूल अधिकाऱ्यांना सामील करून घेवून भाऊ गोविंदा ढवण यांचे नाव कमी करून कोणत्याही सक्षम अधिकाऱ्यांच्या हुकूमाशिवाय व कोणत्याही वर्दी अर्जाशिवाय कोणताही

Assistant Suprintendent.

फेरफार न घालता बाबू गोविंदा ढवण यांचे नाव लावले. या नोंदी पूर्णपणे खोटया व मुलतः बेकायदेशिर आहेत.

७. प्रतिवादी नं. १ ते ५ यांचा दावा मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा व कसलाही हक्कसंबंध नाही. दावा मिळकतीमध्ये आम्ही चालू साली बाजरीचे पिक स्वतः कष्ट मशागत करून केलेले असून त्यांची साधारण १ ते २ फुट उंची वाढलेली आहे.

म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी ता. १०.०४.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो.

(ॲड. डी. एम. पोतदार)

<u>प्रतिज्ञा</u>

मी यातील वादी नं. १. श्री. प्रविण नामदेव ढवण व. व. ३४, धंदाः शेती, रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील नमुद ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी ता. १०.०४.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri./Smt. Pravin Namdev Dhavan
Age 34 Occu. Agri
of Mangewadi, Tal: Radhnagari
Who identified by Shri./Smt. D. M. Potdar.
Adv. Whom I Know personally
Dated 10/4/2026

Assistant Superintendent